 विशेष दिवाणी दावा क्र.१३/२०२०
शिवाजी .. वि .. बालाजी व इतर
वादी तर्फे सा.क्र.४
**(नि.क्र.९९)**

**शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नांव:-** सतिष किशनराव केंद्रे, **वय:- ५८** वर्षे,

**व्यवसाय:-** नौकरी, **रा.**रोहिणा, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.बी.फड यांच्यामार्फत सुरु.**

**१.** १९९१ साली मी ग्रामसेवक म्हणुन पंचायत समिती, परांडा येथे नौकरीस लागलो. २०२० साली मी विस्तार अधिकारी म्हणुन अहमदपूर पंचायत समितीमध्ये रुजू झालो. मला अहमदपूर पंचायत समितीचे कागपदत्रे दाखविल्या मी ओळखेन. आता मला **नि.क्र.६१** दाखविला त्यावर गट विकास अधिकारी, अहमदपूर यांची सही व शिक्का आहे. ती मुळ कागदाची सत्यप्रत आहे. आता मला मला **नि.क्र.६२** दाखविला. त्यावर गटविकास अधिकारी यांची सही व शिक्का आहे. **नि.क्र.६३** आता मला दाखविला. त्यावर जिल्हा परिषद मुख्याधिकारी, लातूर यांची सही आहे आणि सांक्षांकित म्हणुन गटविकास अधिकारी यांची सही आहे. आजरोजी प्रतिवादी क्र.१ यांचे गटविकास अधिकारी, अहमदपूर यांच्या ताब्यातील सेवापुस्तक आणलेले आहे. **नि.क्र.६४** ही या सेवापुस्तकाची साक्षांकित प्रत आहे. सदर सेवापुस्तकातील नोंदीप्रमाणेच **नि.क्र.६४** ही नोंद आहे. सेवा पुस्तक मी आजरोजी न्यायालयात ठेवू शकतो. मात्र त्यातील नोंदींसाठी ते सतत कार्यालयास लागत असल्याने कायमस्वरुपी ठेवता येणारे नाही. आता मला **नि.क्र.६५** हा कागद दाखविला. त्याची मुळ प्रत आमच्या कार्यालयामध्ये मला शोधावी लागेल. ती सापडल्यास मी आणुन देईन. **नि.क्र.६५** ही प्रतिवादी क्र.१ च्या मासीक टूर डायरीची जुलै-२००७ सालची प्रत आहे. आता मला **नि.क्र.१०१/1** हे पत्र दाखविले. ते मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना गट विकास अधिकारी, अहमदपूर यांनी पाठविलेले पत्र असुन त्यावर गटविकास अधिकारी अहमदपूर यांची सही व शिक्का आहे. ती गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित करुन दिलेली प्रत आहे. प्रमाणिकरणाचा सही व शिक्का गटविकास

अधिकारी यांचाच आहे. त्यास **नि.क्र.१०२** देण्यात येतो.

(मासीक टूर डायरीचा **नि.क्र.६५** चा मुळ कागद आणेपर्यंत सरतपास तहकूब)

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
**स्वाक्षरीत/-**

**( एस.एन.सरडे )**

दिनांक १९/०३/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.

**दिनांक:२९/०३/२०२५.**

**पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.बी.फड यांच्यामार्फत सुरु.**

**२.** आजरोजी मासीक टूर डायरी आणण्यासंदर्भात मला सांगण्यात आले होते. सदर डायरी मिळून आली नाही कारण ती निर्लेखीत केलेली आहे. जुलै-२००७ या महिन्याची ती डायरी होती. सदर डायरी ही अभिलेख-क या प्रकारात येते. क वर्गातील कागदपत्रे ५ वर्षापर्यंत जतन करता येतात. त्यानंतर ते नाश केले जातात. सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००७, महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) २८फेब्रुवारी २००८ मधील तरतुदीनुसार सदर अभिलेख ५ वर्षानंतर नष्ट केलेला आहे. सदर डायरी निर्लेखन केल्याबद्दलचा अहवाल आजरोजी मी आणलेला आहे. त्यामध्ये अनुक्रमांक २१४ वर सदर डायरी निर्लेखीत केल्याबद्दल उल्लेख आहे. त्या डायरीचा नमुना क्र.२८ असतो. सदर अहवाल आता मला दाखविला. त्यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहमदपूर यांची सही व शिक्का आहे. सत्यप्रत केल्याबद्दल सद्याचे गट विकास अधिकारी श्री.माने यांची सही व शिक्का आहे. ती मी ओळखतो. अहवालास **नि.क्र.१०३** देण्यात येते. सदर महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेला **नि.क्र.१०४** देण्यात येतो.

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.कांबळे यांच्यामार्फत सुरु.**

**३.** हे खरे की, नि.क्र.६१, ६२, ६३, ६४, ६५, १०१ आणि १०२ यावरील हस्ताक्षर माझे नाही आणि त्यावरील सहीसुध्दा माझी नाही. सन २००७ मध्ये वादीने ग्रामसेवक, मौजे चोबळी यांच्याकडे खंडणी मागितल्या कारणाने प्रतिवादी क्र.१ याने वादीविरुध्द पोलिस ठाण्यात तक्रार केल्याचे मला माहिती नाही. वादीने याकामी माहितीच्या अधिकारात आमच्या कार्यालयात कांही अर्ज केले असल्याचे माझया ऐकिवात आहे. ते अर्ज नेमके किती आहेत हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, मी आजरोजी वादीच्या हितासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ व ३ तर्फे पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.शेळके यांच्यामार्फत सुरु.**

**४.** प्रोसिडींग बुक पान क्र.१ ते ८९ **(नि.क्र.६१)** यावर ग्रामपंचायतीचा शिक्का नाही व ते प्रमाणित झालेले नाही असा मजकूर नमुद आहे. हे खरे की, जोपर्यंत कागद ग्रामसेवक, ग्रामविस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी किंवा गट विस्तार अधिकारी यांच्याकरवी प्रमाणित होत नाही तोपर्यंत त्या कागदाला किंमत नसते. एखाद्या अधिका-याने किंवा लोकसेवकाने दुस-या अधिका-याला किंवा लोकसेवकाला विना सही, शिक्का आणि प्रमाणीत न केलेला दस्ताऐवज जर पाठविला तर तो खरा मानता येत नाही हे खरे आहे. हे खरे की, त्या कागदावर असलेला गट विकास अधिका-यांचा सही, शिक्का हा सत्यप्रत म्हणुन आहे. हे खरे की, **नि.क्र.६१** या प्रोसिडींग बुकाशी माझा कांहीही संबंध नाही. हे खरे की, वादी, प्रतिवादी आणि ग्रामपंचायत मुळकी यांच्याशी संबंधीत अभिलेख

दाखल करण्याचे काम मी केलेले आहे. अभिलेखाचे प्रमाणिकरण गटविकास अधिकारी करतात.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे पुर्ण.</u>** **श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष
**स्वाक्षरीत/-**

**( एस.एन.सरडे )**

दिनांक २९/०३/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.

विशेष दिवाणी दावा क्र.१३/२०२०.
शिवाजी .. वि .. बालाजी व इतर
वादी तर्फे सा.क्र.४
**(नि.क्र.९९)**